# FOGSI

Federation of Obstetric & Gynecological Societies of India

## Press Conference to Announce

# High Dependency Units and Specialized Obstetric ICU for Critical Care in Obstetrics

**On 19-21st July 2013, Friday - Sunday**

**At Satara**

**Strategic Consultancy & Integrated Communications Firm**

- **Ideation to implementation for desired output**
- **Knowledge consultancy / Media advocacy**
- **Public Affairs / Branding / Marcom - PR**

**Print media coverage**

| S.No. | Name of the Publications |
|---|---|
| 1 | Gamodhar –(with photo) |

| Name of Media: | Gamodhar | Language: | Marathi |
|---|---|---|---|
| Date : | 25.07.13 | Page: | 03 |

# एफओजीएसआयतर्फे हाय डिपेन्डन्सी युनिट्स (एचडीयू) उभारण्यासाठी पुढाकार

सातारा- प्रसूतिशास्त्रातील तातडीचे उपचार (क्रिटिकल केअर इन ऑब्स्टेट्रिक्स) या विषयावरील उच्च जोखमीचे गरोदरपण (हाय रिस्क प्रेग्नन्सी) असलेल्या महिलांना उत्तम दर्जाची तातडीची उपचार सेवा पुरवण्यासाठी, तसेच या प्रयत्नांत भारत व दक्षिण आशियाई देशांतील माता मृत्यू दर (मॅटर्नल मॉरटॅलिटी रेट - एमएमआर) कमी करण्यासाठी देशातील प्रसूतितज्ज्ञ (ऑब्स्टेट्रिशियन्स) व स्त्रीरोगतज्ज्ञांची (गायनॅकॉलॉजिस्ट्स) शिखर संघटना असलेल्या फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडियाफने (एफओजीएसआय) प्रवर्तनीय पुढाकार घेतला आहे. त्याअंतर्गत ही संघटना सार्वजनिक, तसेच खासगी आरोग्य क्षेत्रांना ङहाय डिपेन्डन्सी युनिट्सफ (एचडीयू) व स्पेशलाइज्ड डेडिकेटेड ऑब्स्टेट्रिक आय. सी. यू. या विभागांची स्थापना व जोपासना करण्यात सहकार्य करणार आहे.

भारतात राष्ट्रीय सरासरी माता मृत्यू प्रमाणफ (एमएमआर) एक लाख जन्मांमागे (लाईव्ह बर्थ) २१२ आहे. याचाच अर्थ एक लाख जन्म संख्येत सरासरी २१२ मातांचा मृत्यू ओढवतो. विकसित देशांत हेच गुणोत्तर एक लाख जन्मांमागे केवळ १० ते ३० आहे. भारतात अगदी रुग्णालयांत होणाऱ्या प्रसूतिंची संख्या लक्षात घेतली तरी त्यात हा दर एक लाख अपत्य जन्मांमागे ६० ते ९० इतका, म्हणजेच विकसित देशांच्या तुलनेत लक्षणीय अधिक आहे. याचाच अर्थ भारतात उच्च जोखमीच्या गरोदरपणांत दर्जेदार प्रसूति सुरक्षा पुरवताना, तसेच प्रसूतिशास्त्रातील तातडीचे उपचार पुरवताना काही ना काही त्रुटी आहेत. एमएमआरफ हे केवळ हिमनगाचे टोक असून प्रत्यक्षात ही समस्या व्यापक आहे कारण प्रसूतीदरम्यान एका मातेच्या मृत्यूबरोबरच मरता मरता वाचलेल्या मातांची संख्याही ६० ते ८० असते. अशा जिवंत माता पुढे दीर्घकालीन रोगग्रस्त बनू शकतात.




भारतात गरोदरपणाशी संबंधित मृत्यू मुख्यतः दोन कारणांनी ओढवतात. १) योग्य त्या आरोग्य सुरक्षेचा अभाव (रुग्णालयीन उपचार न मिळणे) आणि २) गरोदरपणाशी संबंधित अन्य समस्या उदाहरणार्थ - अतिरक्तदाब (हायपरटेन्शन), गर्भिणी विषबाधा (इक्लाम्प्सिया), रक्तस्राव (हिमोरेज), पू धरणे (सेप्सिस), मधुमेह (डायबेटिस), कावीळ (जाँडीस) यासारखी गुंतागुंतीची लक्षणे किंवा रुग्णालयात नेण्यास विलंब होणे, वाहतूक सुविधांचा अभाव वगैरे. या दोन्ही कारणांमुळे गरोदरपणात जोखीम वाढते व त्यासाठी तेवढीच तातडीची सुरक्षा पुरवावी लागते.

फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया (एफओजीएसआय) ही व्यावसायिक संघटना असून ती भारतातील प्रसूतिशास्त्र व स्त्रीरोग विज्ञान क्षेत्रातील डॉक्टरांचे प्रतिनिधीत्व करते. या क्षेत्रांतील २१९ सोसायट्या व २७००० हून अधिक व्यक्ती या संघटनेच्या सदस्य आहेत. विशेष व्यावसायिकांची सर्वाधिक सदस्य नोंदणी असणाऱ्या संघटनांपैकी ती आहे. तिची स्थापना मद्रासमध्ये ६ जानेवारी १९५० मध्ये सहाव्या ऑल इंडिया काँग्रेस ऑफ ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनॅकॉलॉजीफ परिषदेत झाली. त्यावेळी अहमदाबाद, बंगाल, बॉम्बे, मद्रास व पंजाबच्या ऑब्स्टेट्रिक अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायट्यांनी पुढाकार घेऊन अशी शिखर संघटना स्थापण्याचा प्रस्ताव मांडला आणि ङएफओजीएसआयफला मूर्त रुप प्राप्त झाले.